यवतमाळ जिल्हा अखिल कुणबी समाज यवतमाळ द्वारा संचालित–

# गोपिकाबाई सीताराम गावंडे महाविद्यालय, उमरखेड

पीन– 445206 जि. यवतमाळ

कला–वाणिज्य–विज्ञान आणि उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम

डॉ. एम. बी. कदम
एम.कॉम. एम.फिल पीएच.डी.
प्राचार्य

NAAC, Accridiated "B++" grade
gsgcollege1966@gmail.com
www.gsgcollege.edu.in

संदर्भ

दिनांक 24/08/22

## सामंजस्य करार

करिअर कट्टा आणि महाविद्यालय

पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण

पार्टी नं. १ :- करिअर कट्टा (MITSC)

पार्टी नं. २ :- महाविद्यालयाचे नाव - गोपिकाबाई सीताराम गावंडे महाविद्यालय उमरखेड जि यवतमाळ

**उद्देश**

महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने **"करिअर कट्टा"** या उपक्रमांतर्गत पोलीस भरती पूर्व प्रशिक्षणासाठी ऑनलाइन पद्धतीने मार्गदर्शन करून विद्यार्थ्यांच्या मध्ये यशस्वीतेचे प्रमाण वाढवण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. या माध्यमातून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना ऑनलाइन पद्धतीने तज्ञ व्यक्तीचे मार्गदर्शन उपलब्ध होईल आणि महाविद्यालयाच्या वतीने मैदानावर विद्यार्थ्यांचा सराव घेतल्यानंतर त्यांना शासकीय नोकरीमध्ये समाविष्ट होण्यासाठी मदत होईल व त्याचे चांगले परिणाम होतील या उद्देशाने महाविद्यालय व करिअर कट्टा एकत्रितरित्या हा सामंजस्य करार करीत आहे.

**करिअर कट्ट्याची जबाबदारी**

१. सदर अभ्यासक्रम ठरवणे.

२. अभ्यासक्रमासाठी आवश्यक असणारे तज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन उपलब्ध करून देणे.

३. सदर अभ्यासक्रमांतर्गत प्रशिक्षणानंतर विद्यार्थ्यांच्या अंतर्गत मूल्यांकनासाठीच्या परीक्षांचे नियोजन करणे.

४. योग्य त्यावेळी विद्यार्थ्यांना आवश्यकतेप्रमाने तांत्रिक बाबींची माहिती देण्याचे विशेष सेशन आयोजित करणे.

**महाविद्यालयाची जबाबदारी**

१. करिअर कट्टा अंतर्गत सुरु असणाऱ्या पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षणाची माहिती विद्यार्थ्यांना देणे.

२. विद्यार्थ्यांची नोंदणी करून घेऊन या प्रक्रियेमध्ये समाविष्ट करून घेणे.

३. समाविष्ट विद्यार्थ्यांच्या नियमित उपस्थितीबाबत वारंवार अहवाल घेऊन उपस्थितीमध्ये सातत्य राहील यासाठी प्रयत्न करणे.

४. महाविद्यालयीन स्तरावर शारीरिक शिक्षणाचे जे प्रशिक्षक उपलब्ध आहेत त्यांच्याकडून विद्यार्थ्यांच्या शारीरिक क्षमता चाचणीच्या आवश्यक ते सराव करून घेणे.

५. विद्यार्थ्यांना आवश्यक असणारे स्थानिक पातळीवरची साधनसामग्री उपलब्ध करून देणे.

**नियम व अटी**

१. सदर बाबींमध्ये विद्यार्थ्यांच्याकडून कोणत्याही शुल्क करिअर कट्टा कडून आकारले जाणार नाही.

२. महाविद्यालयाला अपेक्षित असल्यास विद्यार्थ्यांच्या अतिरिक्त सुविधेसाठी किफायतशीर दरामध्ये महाविद्यालय उपलब्ध करून देऊ शकते त्यासाठी आकारण्याचा आणि खर्च करण्याचा अधिकार महाविद्यालयाचा असेल.

३. सदर सामंजस्य कराराचा कालावधी तीन वर्षासाठी असेल.

४. सदर उपक्रमांमध्ये करिअर कट्ट्याच्या नोंदणी शुल्काव्यतिरिक्त कोणतेही शुल्क पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षणासाठी अतिरिक्त घेतल्यास करिअर कट्ट्याच्या नावाने घेतल्यास ती संपूर्ण जबाबदारी महाविद्यालयाची असेल.

५. सदर प्रशिक्षणामध्ये दिले जाणारे प्रशिक्षण हे विद्यार्थ्यांच्या तयारीसाठी करून जात असते शासकीय भरती प्रक्रिया हा या उपक्रमाचा भाग नाही.

६. वर्षभरामध्ये चालणाऱ्या प्रशिक्षणाच्या बॅचेसचे नियोजन हे राज्यस्तरीय पद्धतीने करण्यात येईल.

७. व्यक्तिगत महाविद्यालयाच्या सोयीनुसार त्याच्यामध्ये बदल करता येणार नाही.

१. यशवंत शितोळे

Yasswant

अध्यक्ष, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र

Maharashtra Information Technology Support Centre
Gove Of Mha. Regd. No. MH - 22640

२. महाविद्यालयाचे नाव - गोपिकाबाई सीताराम गावंडे महाविद्यालय उमरखेड जि यवतमाळ

३. प्राचार्य - डॉ. एम. के. कदम

**Principal**
**G.S.Gawande College.**
**Umarkhed Dist.Yavatm**

४. समन्वयकांचे नाव - डॉ. पी. जी. सरपाते